डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

कृषि नगर, अकोला (महाराष्ट्र) ४४४ १०४

# जाहीरात

**क्र. पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१४** **दिनांक :- १७ जुलै, २०१४**

मा. सर्वोच्च न्यायालयाचे अपिल याचीका क्रमांक ४४१२/२०१४, ४४१३/२०१४ ४४१४/२०१४ व ४४१५/२०१४ मधील दिनांक ०४.०४.२०१४ रोजीचे निर्णयानुसार या विद्यापीठात वरिष्ठ संशोधन सहायक व कनिष्ठ संशोधन सहायक या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

विद्यापीठ परिनियमातील सुधारणा सध्यास्थितीत शासनाचे विचाराधीन आहे परिनियमात सुधारणे नंतर आवश्यकते नुसार योग्य तो बदल करण्याचे अथवा अनुषंगीक निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठास राहतील.

जाहीरातीव्दारे भरावयाच्या पदांचा तपशिल व आरक्षण खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | पदनाम | वेतन बॅन्ड | भरावयाची पदे | समांतर आरक्षण ↓ | सामाजिक आरक्षण → | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अ.जा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| १ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक | ९३००-३४८००/- ग्रे.वे. ४४००/- | | महिला | ३ | १ | १ | १ | १ | १ | | ३ | १० | २१ |
| | | | | खेळाडु | | | | | | | | | २ | २ |
| | | | | अपंग | | | | | | | | | | |
| | | | | इतर | ७ | ४ | १ | १ | १ | १ | १ | ९ | २३ | ४८ |
| | | **एकुण पदे** | ७१ | | १० | ५ | २ | २ | २ | २ | १ | १२ | ३५ | ७१ |
| २ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | ९३००-३४८००/- ग्रे.वे. ४२००/- | | महिला | ३ | १ | १ | १ | १ | | १ | ४ | ११ | २३ |
| | | | | माजी सैनिक | १ | | | | | | | २ | ५ | ८ |
| | | | | खेळाडु | | | | | | | | १ | २ | ३ |
| | | | | प्रकल्पग्रस्त | | | | | | | | १ | २ | ३ |
| | | | | अपंग | ०१ (श्रवणशक्तीतील दोष) | | | | | | | | | |
| | | | | अंशकालीन कर्मचारी | १ | | | | | | | १ | ३ | ५ |
| | | | | इतर | ५ | २ | १ | १ | २ | १ | १ | ४ | १३ | ३० |
| | | **एकुण पदे** | ७२ | | १० | ३ | २ | २ | ३ | १ | २ | १३ | ३६ | ७२ |
| **एकुण पदे** | | | १४३ | | | | | | | | | | | |

दिनांक ०९ जुलै २०१४ रोजीच्या शासनाचे आरक्षण अध्यादेशानुसार या जाहिरातीत दाखविण्यात आलेल्या पदांची संख्या (Revised) पुर्नगठित होण्याची शक्यता आहे. या संबंधिचे शुध्दीपत्रक आवश्यकतेनुसार देण्यात येईल.

**<u>सज्ञांचे अर्थ</u>**

अजाः अनुसुचित जाती, अज : अनुसुचित जमाती, विजा : विमुक्त जाती, भज : भटक्या जमाती, इमाव : इतर मागास प्रवर्ग, विमाप्र : विशेष मागास प्रवर्ग

**आरक्षित पदे ही फक्त महाराष्ट्र शासनाने वेळोवळी अधिकृत केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षीत आहेत.**

जाहिरातीमधील पदांना आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक | संबंधीत विषयातील (कृषि व संबंधीत) पदव्युत्तर पदवी |
| २ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | संबंधीत (कृषि व संबंधीत) विद्याशाखेतील पदवी |
| **टिपः** शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय दि. १०.१२.९८ नुसार मुक्त विद्यापीठ कृषि वा संबंधीत विद्याशाखेतील पदवीधारकांनी वरिल पदांसाठी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. | | |

**<u>मुल्यांकनाचे स्वरूप</u>**

| अ.क्र. | संवर्ग | मुल्यांकनाचे स्वरूप | | एकुण |
|---|---|---|---|---|
| | | शैक्षणिक गुणवत्ता | मुलाखत | |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १ | वरिष्ठ संशोधन सहाय्यक | ८० | २० | १०० |
| २ | कनिष्ठ संशोधन सहाय्यक | ८० | २० | १०० |

मुल्यांकनातील शैक्षणिक गुणवत्तेस ८० गुणांचे विश्लेषण विद्या परिषद व कार्यकारी परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे असून त्यासंबंधीची माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**वयोमर्यादा :**

अ) दिनांक ०७.०८.२०१४ रोजी सर्वसाधारणतः उमेदवाराचे वय वर्षे १८ पेक्षा कमी व ३३ पेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांकरिता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथीलक्षम राहील.

ब) मा सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त अपिल प्रकरणातील अपिलकर्ते विद्यापीठातील वरिष्ठ संशोधन सहाय्यक व कनिष्ठ संशोधन सहाय्यक पदावर कार्यरत कर्मचा-यांना अर्ज सादर करण्यासाठी कमाल वयोमर्यादेत सुट देण्यात येत आहे.

क) शासन निर्णय व कार्यकारी परिषद ठरावानुसार खालील प्रमाणे कमाल वयोमर्यादा विहीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | कमाल वयोमर्यादा | शेरा |
|---|---|---|---|
| १. | अपंग उमेदवार / प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / माजी सैनिक | ४५ वर्षे | शासन निर्णयानुसार |
| २. | शासनातील अंशकालीन उमेदवार | ४६ वर्षे | |
| ३. | खेळाडु उमेदवार / स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नामनिर्देशित उमेदवार (विहित नमुन्यातील नामनिर्देशनपत्र जोडणे आवश्यक ) | ५ वर्षाची अट शिथील खुला प्रवर्ग ३३ + ५ म्हणजे ३८ आणि मागासवर्गीय ३८ + ५ म्हणजे ४३ वर्ष | |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | या विद्यापीठात तसेच महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठामध्ये नियमीत आस्थापनेवर वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | ५० वर्ष | शासन परिपत्रक दि ०१.११.०३ व का.प.ठराव दि १०.०३.१२ |
| ५. | राज्य शासन / केद्र शासन/ निमशासकीय संस्था / शासन अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नियमित आस्थापनेवर व वेतन श्रेणीमध्ये कार्यरत कर्मचा-यांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा. | ४५ वर्ष | |

**महत्वाच्या सुचना :**

१) उमेदवारानी विद्यापीठाचे **http:/pdkv.ac.in** या संकेतस्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावयाचा असून दिनांक २३.०७.२०१४ पासून संबंधीत लिंक उमेदवारांना उपलब्ध होईल. उमेदवारांना दि. ११.०८.२०१४ पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल व संगणक आज्ञावली मधून तयार झालेल्या अर्जाची हार्ड कॉपी संबंधीत आवश्यक कागदपत्रे व धनाकर्षासह दि. १६.०८.२०१४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कुलसचिव, डॉ. पं.दे. कृ.वि. अकोला यांचेकडे पोस्टाव्दारे अथवा व्यक्तीशः सादर करावी. उमेदवाराने विहीत दिनांकापर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरला असला तरी अर्जाची हार्ड कॉपी विहीत दिनांकापर्यंत प्राप्त न झाल्यास अथवा उशीरा प्राप्त झाल्यास असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाच्या विलंबासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

२) विद्यापीठाच्या यापुर्वीच्या जाहिराती नुसार एखादया उमेदवाराने अर्ज केला असल्यास या जाहिरातीनुसार नव्याने अथवा स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक राहील व अशा अर्जासोबत विहीत रकमेचे धनाकर्ष जोडणे आवश्यक राहील. सदर उमेदवारास यापुर्वीच्या जाहिरातीचा संदर्भ देवून वयोमर्यादा, प्रक्रीया शुल्क अथवा कुठल्याच प्रकारची शिथीलता अनुज्ञेय असणार नाही.

**आवेदन शुल्क**

१. मागावसर्गीय उमेदवारांकरिता रू २५०/-.

२. बिगरमागासवर्गीय उमेदवारांकरिता रू ५००/-

**टिप - अपंग व माजी सैनिक उमेदवारांनी आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

वरील प्रमाणे आवेदन शुल्क सहायक कुलसचिव, साप्रवि, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला (Assistant Registrar (GAD), Dr. P.D.K.V, Akola) यांचे नावे असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा अकोला येथे देय असलेला धनाकर्षाव्दारेच स्विकारण्यात येईल. धनाकर्ष अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. आवेदन शुल्क हे ना-परतावा राहील.

**सर्व साधारण शर्ती/अटी व सुचना :**

| | |
|---|---|
| १) | उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्राची (Domicile Certificate) प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक) |
| २) | उमेदवारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ३) | उमेदवारांना मुलाखतीसाठी नियोजित ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| ४) | अपंगासाठी राखीव ठेवण्यांत आलेल्या पदासाठी जाती प्रवर्गाचे आरक्षण लागू नाही. सर्व जाती प्रवर्गातील तसेच खुला प्रवर्गातील अपंग उमेदवार अर्ज करू शकतात. अपंग उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या सामाजिक प्रवर्गाच्या उपलब्ध पदावर उमेदवारास सामावुन घेण्यात येईल. |
| ५) | अपंग प्रवर्गातील उमेदवारांचे अपंगात्वाचे किमान प्रमाण ४० टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र साक्षांकित करून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. या प्रमाणपत्रावर उमेदवाराचे छायाचित्र असणे आवश्यक आहे. |
| ६) | उमेदवारांनी विहीत नमून्यातील अर्जासोबत एक पासपोर्ट साईज (अलिकडील काळातील) फोटो स्पेपल करून लावावा. (संगणक प्रणालीतून स्कॅन झालेल्या फोटो व्यतिरिक्त) |
| ७) | उमेदवारानी अर्जावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे, अन्यथा अर्ज अपात्र करण्यांत येईल. |
| ८) | पदासाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व शैक्षणिक गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यांत येणा-या मौखीक परिक्षे बाबतची माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यांत येईल. |

| | |
|---|---|
| ९) | उमेदवार एका पेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करू शकतील, तथापी प्रत्येक पदासाठी स्वतत्र अर्ज करणे, आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे व विहीत परिक्षा शुल्क भरणे अपरिहार्य राहील. आरक्षित प्रवर्गातुन अर्ज करीत असतांना त्याच पदाकरीता खुल्या प्रवर्गासाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. |
| १०) | निवड झाल्या नंतरही भविष्यात उमेदवाराने त्याच्या अर्जात सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास त्यास नोकरीतून काढून टाकण्यांत येईल. |
| ११) | अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला असल्यास जात वैधता प्रमाणपत्र समांतर आरक्षाणा अंतर्गत आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी विहीत केलेले आवश्यक प्रमाणपत्र इत्यादी कागपत्रांच्या सांक्षाकित प्रती जोडणे अनिवार्य आहे. सांक्षाकित प्रती केंद्र/राज्य शासनाच्या राजपत्रित अधिकारी/पोष्ट माष्टर/मान्यताप्राप्त विद्यालय/महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य, विशेष कार्यकारी अधिकारी किंवा याबाबत प्राधिकृत करण्यांत आलेल्या व सक्षम अधिका-यानेच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल. |
| १२) | शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या सक्षम प्राधिका-याच्या पूर्वपरवानगीने सादर करावे व अशा परवानगीचे (ना हरकत प्रमाणपत्र) प्रत अर्जासोबत जोडावे. तसेच या विद्यापीठात कार्यरत कर्मचा-यांना अर्जासोबत ना हरकत प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता असणार नाही. |
| १३) | अनुभवाच्या कालावधीची गणना करतांना तासिका (On Hour Basis), नियत कालीका (Periodical), विद्यावेतन (On Stipend), अभ्यागत (Visiting), अंशदानात्मक (Contributory), विनावेतन (Without Pay) तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा कालावधी, व प्रभारी (Incharge) म्हणुन नेमणुकीचा कालीवधी, अतिरिक्त कार्यभाराचा (Additional Charge) कालावधी तसेच अध्ययन रजेचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही. |
| १४) | शासकीय/ निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांना अनुभव प्रमाणपत्र देतेवेळी, कार्यालय प्रमुखांनी संबंधीत कर्म-यांनी उपभोगलेल्या अध्ययन रजेचा कालावधी एकूण अनुभवामध्ये नमुद करण्यात येवू नये. |
| १५) | महिलांसाठी असलेले आरक्षण हे संबंधित सामाजीक प्रवर्गासाठी समांतर राहील, तथापी संबंधित प्र्वगातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र ठरणा-या पुरूष उमेदवारामधून भरण्यांत येतील. |
| १६) | अनुसूचित जाती/जमाती वगळता वि.जा.भ.ज., विमाप्र व इमाव प्रवर्गातील सर्व उमेदवारांना सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी, खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी खेळाडु साठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आणि खुल्या प्रवर्गातुन महिला आरक्षणाचा लाभ घेवु इच्छिणा-या महिला उमेदवार यांनी अर्ज प्राप्तीचे अंतिम दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय आरक्षणाचा लाभ मिळणार नाही. |
| १७) | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम २००५ मधील नियम ४ मधील तरतुदीनुसार लहान कुटूंब मर्यादेचे नमूना अ मधील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| १८) | अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसांठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र. राकिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दिनांक ३०-४-२००५ मधील तरतुदीनुसार राहील. |
| १९) | एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. |
| २०) | रिक्त पदांच्या संख्येत व आरक्षणात कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. मुल्यांकन प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे किंवा अशंता बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठाने स्वतःकडे राखून ठेवलेले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. |
| २१) | उपरोक्त पदासाठी रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, (सेवायोजन कार्यालय), आदीवासी प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त होणा-या जनगणना/अंशकालीन कर्मचा-यांची शिफारस होणा-या उमेदवारांनी जाहीरातीत नमूद सर्व अटी व शर्तीच्या अधिन राहून त्या-त्या पदांसाठी विहीत आवेदन शुल्क भरून अर्ज करणे बंधनकारक राहील. |
| २२) | अंशकालीन कर्मचा-यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील नोंदणी करणे आवश्यक राहील. अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत जोडावी अन्यथा वयोमर्यादेत सुट दिली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| २३) | शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर, २००५ प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू राहील. |
| २४) | निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणि उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल. |
| २५) | शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र बीसीसी२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातुन उमेदवाराची निवड झाल्यास अशा उमेदवारास तात्पुरत्या नियुक्तीपासुन ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| २६) | शासन परिपत्रक क्र. पीआई/२००४/३८५५/प्रशि-१, दिनांक २ जून २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये माजी सैनिक अथवा युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यु पावलेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटूंबातील फक्त जवानाची पत्नी किंवा अपंग जवानाची पत्नी यांना पात्र समजण्यांत येईल. |
| २७) | उमेदवारांनी अर्ज करतांना त्यामधील सर्व बाबी परिपूर्ण भरून अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडाव्यात. एकदा अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कागदपत्रांचा/प्रमाणपत्राचा स्विकार केला जाणार नाही किंवा उमेदवारास त्यामध्ये बदल अथवा दुरूस्ती करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. |
| २८) | जे उमेदवार पूर्वीपासूनच विद्यापीठाच्या/शासन सेवेत आहे अशा उमेदवारांनी त्या बाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. |
| २९) | या जाहिरातीतील पदांमध्ये गडचिरोली जिल्ह्यासह नक्षलग्रस्त भागात विद्यापीठांतर्गत विविध कार्यालयातील पदांचा समावेश आहे. नक्षलग्रस्त भागातील आस्थापनेवर नियुक्ती झाल्यास एकस्तर पदोन्नती संबंधीचे लाभ शासन निर्णयानुसार अनुज्ञेय राहील. |
| ३०) | समांतर आरक्षणा अंतर्गत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या-त्या प्रवर्गातुन इतर पात्र उमेदवारातुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. |
| ३१) | या विद्यापीठा व्यतिरिक्त इतर आस्थापनांवरील कार्यरत कर्मचा-याची निवड झाल्यास विद्यापीठ सेवत रूजु होण्याकरीता त्यांना त्यांच्या पुर्वीच्या पदाचा राजीनामा देणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना विद्यापीठ सेवेत रूजु करून घेतले जाणार नाही. |
| ३२) | अपेक्षेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास उमेदवारांच्या चाळणी विषयी निर्णय घेतला जाईल व तसे उमेदवारांना सुचीत केले जाईल. |

उपरोक्त जाहीरात संकेतस्थळ (**www.pdkv.ac.in**) वर उपलब्ध आहे.

**स्वाक्षरीत/-**
**कुलसचिव,**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**

ठिकाण :- डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला
दिनांक :- १७-०७-२०१४